बिलीफ बायोटेक, चिपरी
ता. शिरोळ, जि. कोल्हापूर
मो. नं. 9850895072, 8275002072, 9850301072

# पेरु लागवड तंत्रज्ञान

फळझाडामध्ये पेरु हे एक महत्वाचे फळपीक आहे. भारतीय फळझाडाखालील एकूण क्षेत्रापैकी 6 ते 7 टक्के क्षेत्र पेरुच्या लागवडीखाली आहे. भारतामध्ये लागवड व उत्पादनाच्या बाबतीत पेरुचा फळझाडांच्या मालिकेत चौथा क्रमांक लागतो. महाराष्ट्रात जवळजवळ 42000 हेक्टर क्षेत्र पेरुच्या पिकाखाली आहे. जमीन आणि हवामानाचा विचार करता महाराष्ट्र राज्यात पेरु लागवडीस भरपूर वाव आहे. पेरुमध्ये ‘क’ जीवनसत्व मोठ्या प्रमाणात असते. तसेच खनिज, प्रथिने, तंतूमय पदार्थ, पिष्टमय पदार्थ, चुना, लोह इ अन्नघटक काही प्रमाणात असतात.

## ✷ उगमस्थान -

पेरुचे मुळस्थान मॅक्सिको पेरु या देशातील आहे. भारत, ब्रम्हदेश, अमेरिका या देशात पेरुचा प्रसार मोठ्या प्रमाणात झालेला आहे.

## ✷ हवामान -

उष्ण आणि समशितोष्ण हवामानात पेरुची लागवड करतात. कोरड्या व उष्ण हवामानाच्या प्रदेशात जेथे हिवाळ्यात थंडी अधिक असते. अशा भागात पेरुचे उत्पादन चांगले येते. आणि फळांची गुणवत्ताही अधिक चांगली असते. जास्त व सतत पाऊस असलेल्या दमट भागात झाडांची नुसती पालेदार वाढ होते व फळे कमी लागतात. शिवाय फळांची प्रतही खराब असते. आणि त्यावर देवी रोगाचा प्रादुर्भाव होऊ शकतो. पेरुची झाडे पाण्याचा ताण सहन करु शकतात. त्यामुळे दुष्काळी भागात पेरुची लागवड यशस्वी होवू शकते.

## ✷ जमिन –

पेरु सर्व प्रकारच्या जमिनीत व्यवस्थित येवू शकतो. मात्र अधिक उत्पादनासाठी जमिन उत्तम निच-याची असावी. चोपन, अतिभारी, पाणथळ, चुनखडीयुक्त जमिनीत पेरु चे पिक  घेवू नये. जमिनीचा सामू 6.5 ते 8.5 पर्यंत असावा. खोल काळ्या व खाली मुरमाचा थर असलेल्या जमिनीत पेरुची लागवड यशस्वी होऊ शकते.

...2

## ✷ <u>जाती</u> –

पेरुच्या सरदार/लखन्नौ – 49, G विलास, तैवान पिंक, थाई 7, VNR या जातीची लागवड मोठ्या प्रमाणात केली जाते.

## ✷ पेरु लागवडीचे अंतर

घन लागवडीसाठी 3 मिटर X 2 मिटर अंतर ठेवावे. नियोजित अंतरावर एक फूट खोल खड्डा काढावा. प्रथम त्या खड्ड्यामध्ये 2 ग्रॅम थिमेट टाकावे, नंतर 100 ग्रॅम लिंबोळी पेंड + 100 ग्रॅम सिंगल सुपर फॉस्फेट मिक्स करुन टाकावे. त्यावर 500 ग्रॅम ते 1 किलो गांडूळ खत टाकावे व त्यावर रोप लावावे.

पिशवी ब्लेडने कापून बाजूला टाकावे. मुळाभोवती असलेला मातीचा गोळा फुटणार नाही याची दक्षता घ्यावी. सदर गोळा दोन्ही हतानी धरुन खड्ड्यात ठेवावा व माती भरुन अगोदर हताने नंतर अलगत पायाने दाबावे. रोप लावताना रोपांचे कलम जमिनीच्या वर राहील याची काळजी घ्यावी. रोप लागणीनंतर लगेच पाणी द्यावे. जर कलमावर प्लॅस्टिकची पट्टी असेल तर लागणीनंतर 8 दिवसांनी पट्टी कापून काढावी.

## ✷ पेरु कलमांची निगा –

पेरु रोपांची लागण झाल्यानंतर रोपास बांबूच्या काठीचे आधार देणे आवश्यक आहे. रोप लागू झाल्यानंतर जमिनीपासून 1 ½ ते 2 फूट उंचीवर कट करने कट केलेल्या ठिकाणी 3-4 फुटवे निघतील ते परत 6 पानावर (अंदाजे 1 ते 1 ½ फुट) अंतरावर कट करावे म्हणजे प्रत्येकी 3-4 फुटवे याप्रमाणे 10-12 फांद्या तयार होतील. झाडाला चांगला आकार येईल कलमांचे बुरशीजन्य रोगापासून संरक्षण करण्यासाठी बुंध्यावर बोर्डो पेस्ट लावावे.

## ✷ बोर्डो पेस्ट तयार करण्याची पध्दत –

एका बादलीत 4 लिटर पाण्यात 1 किलो मोरचूद विरघळवीने. दुसऱ्या बादलीत 4 लिटर पाण्यात 1 किलो चुना विरघळवीने. दुसऱ्या दिवशी 4 लिटर मोरचूदच्या द्रावणात चुन्याची निवळी हळूहळू ओतने **7 PH** ला थांबणे. नवीन 1 लिटर पाण्यात 20 मिली नुवान व 50 ग्रॅम बाविस्टीन विरघळुन घेणे ते औषध बोर्डो पेस्टमध्ये मिक्स करणे व तयार झालेले पेस्ट खोडावर ब्रशच्या सहाय्याने लावून घेणे.

...3

## ✷ खत व्यवस्थापन -

पेरु कलमे जोमाने वाढण्यासाठी लागणीनंतर 15 दिवसांनी प्रती कलमास

शेणखत = 25 किलो, नत्र = 90 ग्रॅम,स्फुरद = 25 ग्रॅम,पालाश = 30 ग्रॅम, देणे गरजेचे आहे.

∴ झाडापासून 1 फुट अंतरावर **<u>प्रती एकरी</u>** खालील खते टाकून मातीखाली मुजवून घेणे.

- 10: 26: 26 = 100 किलो,
- युरीया निमकोटेड) = 100 किलो,
- $MgSo_4$ = 25 किलो,
- मल्टीप्लेक्स/सुक्षअन्नद्रव्य = 10 किलो,
  (एकत्र करुन टाकणे व माती आड करणे)

❖ लागणीनंतर 6 महिन्यांनी हाच डोस परत टाकणे.

❖ जमिनीत ज्या ठिकाणी ओलावा असते तेथेच रासायनिक खते टाकणे.

## ✷ पाणी व्यवस्थापन -

झाडे लहान असताना कमी अंतराने पाण्याच्या पाळ्या द्याव्यात. बहाराच्या वेळेस गरजेनुसार पाणी द्यावे.

## ✷ आंतरमशागत -

बागेतील तण वेळचेवेळी खुरपुन घ्यावे. बाग स्वच्छ व जमिन भुसभूशीत राहील याची काळजी घ्यावी.

## ✷ फळांची काढणी -

बहार धरल्यापासून 5 महिन्यात पेरुची फळे पिकून तयार होतात. पिकलेल्या फळांचा गर्द हिरवा रंग बदलून पिवळसर होतो. अशा फळांची काढणी करुन विक्रीस पाठवावीत.

## ✷ पीक संरक्षण-

i) पिढ्या ढेकणाच्या नियंत्रणासाठी जैविक व्हरटीसिलीयम लेकाणी फवारणी करावे.

ii) फळमाशीचे नियंत्रणासाठी रक्षक सापळ्याचा वापर करावा.

iii) मर रोग नियंत्रणासाठी ट्रायकोडर्मा चा वापर करावा किंवा बोर्डो मिश्रण 1% द्रावणाची मातीत आळवणी करावी.

iv) फळावरील डागांसाठी बाविस्टीन + मॅन्कोझेब ची फवारणी करावी.

....4

## ✷ तुडतुडे, फुलकिडे व मिली बग साठी -

नुवान, कॉन्फीडोर (इमिडाक्लोरोफीड), ॲक्ट्रा, पेगासस, रिजेंट, एक्झाडोस

## ✷ करपा व भूरीसाठी –

M 45, बाविस्टीन, C.O.C. इ. औषधांचा वापर करावा.

## ✷ जिवामृताचा वापर -

पेरु पिकाला जिवामृतचा वापर खूप फायदेशीर ठरले आहे. म्हणून पावसाळ्यात 6 वेळा, थंडीत 4 वेळा व उन्हाळ्यात 2 वेळा जिवामृताचा वापर करावा.

## ✷ जिवामृत तयार करण्याची पध्दत -

200 लिटर पाण्यात 10 किलो देशी गाईचे ताजे शेण + 5 लिटर देशी गाईचे गोमूत्र + 1 किलो काळा गुळ + 1 किलो बेसन पिठ + 1 मुठ बांधावरची माती यामध्ये गरजेनुसार ॲझोटोबॅक्टर, P.S.B., K.A.B. ट्रायको, मेटॉरिझम, व्हर्टिसिलीयम, बिव्हेरिया इ. जिवाणूचा वापर करु शकता. तयार झालेले द्रावण दररोज सकाळी व सायंकाळी काठीच्या सहाय्याने 10 मिनीटे क्लॉकवाईज फिरविणे व 2-3 दिवसांनी हे द्रावण एक एकर साठी आळवणी करणे.

जिवामृताच्या वापरामुळे पेरु झाडांची खूप निरोगी व सशक्त वाढ होते.

## ✷ महत्वाच्या सुचना -

बागेत फांद्यांची दाटी झाल्यानंतर भरपूर सूर्यप्रकाश व हवा खेळती राहण्यासाठी तसेच यंत्राने मशागत करण्यासाठी हलकी छाटणी केल्यास चांगले उत्पादन मिळू शकते.

☯ ☯ ☯ ☯ ☯